# डॉ. मगदूम फार्मसी कॉलेजमध्ये व्यसनमुक्ती प्रबोधन कार्यक्रम

जयसिंगपूर / महान कार्य वृत्तसेवा

डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, कोल्हापूर आणि महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने व्यसनमुक्ती सप्ताह निमित्त व्यसनमुक्ती प्रचार, प्रसार व प्रबोधन कार्यक्रम आयोजित केला होता. सूत्रसंचालन कु. श्रेया मगदूम हिने केले.

प्रा. प्रणील तोरस्कर यांनी प्रास्ताविकातून प्रमुख पाहुणे ॲड. सुरेश साकटे यांच्या व्यसननिर्मूलनातील त्यांच्या योगदानाची आणि जनजागृती मोहिमेतील त्यांच्या भूमिकेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांनी प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले.प्रमुख पाहुणे ॲड. सुरेश साकटे यांनी आजच्या युवा पिढीसमोरील व्यसनाचे वाढते संकट अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, आज उद्योगधंदा करण्याऐवजी अनेक तरुण व्यसनाच्या आहारी जाताना दिसतात. समाजातील हे चित्र चिंताजनक असून, व्यसनाधीनतेमुळे उध्वस्त झालेल्या युवकांना योग्य मार्ग दाखवण्यासाठी नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य सातत्याने कार्यरत आहे.

कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन डॉ. विजय मगदूम, व्हा.चेअरमन ॲड. डॉ. सोनाली मगदूम आणि प्राचार्य डॉ. शितलकुमार पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. प्रणील तोरसकर आणि प्रा. काशिनाथ हुलवान यांनी केले होते.